नमुना पत्र

## इचलकरंजी महानगरपालिका महापौर व उपमहापौर निवडणूक सभा दि. ०९/०२/२०२६

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामध्ये अनुसुची प्रकरण २ मधील नियम क्र. १ ब महापौर आणि उपमहापौर या पदासाठी निवडणूका घेणे नियम २००५, सुधारीत नियम २००६ व २०१० मधील नियम क्र ३(२) अन्वये इचलकरंजी महानगरपालिकेची पहिली महापालिका सभा (विशेष बैठक) सोमवार दि. ०९.०२.२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. इचलकरंजी महानगरपालिका प्रशासकीय इमारतीमधील सभागृहात विभागीय आयुक्त पुणे यांचे क्र. नपाप्र/४/कावि/५०/२०२६/ दि. २३/०१/२०२६ चे आदेशानुसार श्री संजय शिंदे, अप्पर जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचे अध्यक्षतेखाली आयोजीत करणेत आली होती.

सदर इचलकरंजी महापालिका महापौर व उपमहापौर निवडणूकीच्या विशेष बैठकीसाठी इचलकरंजी महानगरपालिकेचे खालील सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | उपस्थित सदस्य यांचे नाव |
|---|---|
| १ | लोखंडे स्वाती राजेंद्र |
| २ | राणे सचिन लालासो |
| ३ | कोकणे रुपाली नितीन |
| ४ | पाटील उदयसिंग मारुती |
| ५ | तासगांवे यास्मीन मुसा |
| ६ | सावरतकर पदमा लक्ष्मण उर्फ गणेश |
| ७ | जाधव रणजीत गंगाराम |
| ८ | गैबान परवेज लतिफ |
| ९ | इंगवले प्रियंका प्रसाद |
| १० | पाटील योगेश चांगदेव |
| ११ | आवळे सरीता भाऊसो |
| १२ | जांभळे अशोक रामचंद्र |
| १३ | चव्हाण सयाजी मारुती |
| १४ | मोनाली दत्तात्रय मांजरे |
| १५ | कुपटे मनिषा संतोष |
| १६ | हिंगमिरे मनोज भिमाशंकर |
| १७ | मुळीक सतिष वसंतराव |
| १८ | वैशाली सुनील पोवार |
| १९ | जुलेखा जहाँगीर पटेकरी |
| २० | शिवाजी संभाजी पाटील |
| २१ | अलका अशोक स्वामी |
| २२ | किरण श्रीरंग खवरे |
| २३ | विजया सुनील महाजन |
| २४ | चोपडे विठ्ठल पुंडलिक |
| २५ | आवळे क्रांती अब्राहम |
| २६ | प्रमिला रविंद्र जावळे |
| २७ | पाटील नंदकुमार आनंदराव |
| २८ | कारंडे मदन सिताराम |

| अ.क्र. | उपस्थित सदस्य यांचे नाव |
|---|---|
| ३३ | आवळे रुबन सखाराम |
| ३४ | दळवाई धृवती सदानंद |
| ३५ | नवनाळे मनिषा प्रशांत |
| ३६ | धातुंडे उदय आनंदा |
| ३७ | रजपुते रवी साहेब |
| ३८ | विद्या मनोज साळुंखे |
| ३९ | मुथा नूतन दिलीप |
| ४० | पोवार तानाजी बाळू |
| ४१ | प्रदीप नामदेव धुत्रे |
| ४२ | वैशाली शशिकांत मोहिते |
| ४३ | सारीका सुकूमार पाटील |
| ४४ | राजू संभाजी बोंद्रे |
| ४५ | पोवार नितेश किरण (गोट्याभाऊ) |
| ४६ | सुरेखा अजितमामा जाधव (मामी) |
| ४७ | स्नेहल दिपक रावळ |
| ४८ | डाळया अनिल देवकरण |
| ४९ | सातपुते रुपाली अनंत |
| ५० | कवडे शशिकला माळसाकांत |
| ५१ | शेळके चंद्रकांत विष्णू (दादा) |
| ५२ | जाधव अमरजित राजाराम |
| ५३ | भिसे सपना प्रमोद |
| ५४ | मेघा शहाजी भोसले |
| ५५ | वाळवेकर अभिषेक रमाकांत |
| ५६ | सुर्वे ओंकार रामचंद्र |
| ५७ | पुजारी राजू आप्पासो |
| ५८ | ज्योती नागेश पाटील |
| ५९ | भोसले तेजश्री अमृत |
| ६० | संतोष बाबूराव शेळके |

Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| २९ | बुगड रूपा उदय |
| ३० | आलासे संगीता राजु |
| ३१ | तेलनाडे संजय शंकरराव |
| ३२ | माने रविंद्र वसंत |
| | |

| | |
|---|---|
| ६१ | माळी पुनम सचिन |
| ६२ | कलागते सुशांत बाळासो |
| ६३ | स्मिता संजय तेलनाडे |
| ६४ | बचाटे अरुणा प्रमोद |
| ६५ | सुनील शंकरराव तेलनाडे |

इचलकरंजी महानगरपालिका महापौर व उपमहापौर निवडणूकीच्या विशेष सभेच्या कामकाजास सकाळी ११.०० वाजता राष्ट्रगीत व राज्यगीताने सुरुवात झाली.

पिठासीन अधिकारी यांनी नगरसचिव यांना महापौर व उपमहापौर निवडणूकीच्या कामकाजास सुरवात करणेची सुचना केली.

यानंतर नगरसचिव यांनी प्रथम इचलकरंजी महानगरपालिकेच्या नुकत्याच पार पडलेल्या सार्वत्रिक निवडणूकीमध्ये निर्वाचीत झालेल्या सर्व सदस्यांचे तसेच पिठासीन अधिकारी श्री . संजय शिंदे तसेच इचलकरंजी महानगरपालिकेच्या आयुक्त पल्लवी पाटील यांचे आजच्या महापौर व उपमहापौर निवडणूकीच्या विशेष सभेमध्ये स्वागत केले.

विभागीय आयुक्त पुणे विभाग पुणे यांचे आदेशानुसार महापौर व उपमहापौर निवडणूक विशेष सभेच्या पिठासीन अधिकारी पदी संजय शिंदे यांची नियुक्ती करणेत आली असुन त्यांच्या अध्यक्षतेखाली सदर सभेमध्ये महापौर व उपमहापौर निवडणूकीचे कामकाज पुर्ण होणार असलेची माहिती दिली व महापौर व उपमहापौर निवडणूक सभेमध्ये पार पाडणेत येणारे कामकाजाची खालील प्रमाणे माहिती दिली.

* महानगरपालिका महापौर पदासाठी नगरसचिव यांचेकडे विहित मुदतीत प्राप्त झालेली नामनिर्देशन पत्रे पिठासीन अधिकारी यांचे कडे छाननी साठी सादर करणे.
* नामनिर्देशन पत्रांची छाननी होवून वैध नामनिर्देशन पत्रे जाहीर करणे.
* एखाद्या उमेदवारास आपले महापौर पदासाठी दाखल केलेले नामनिर्देशन पत्र मागे घेणे.
* नामनिर्देशन पत्र माघारी साठी देणेत आलेल्या मुदतीनंतर शिल्लक राहिलेल्या उमेदवारांची नावे वर्णानुक्रमे जाहीर करणे.
* आवश्यकतेनुसार महापौर पदाची निवडणूक घेणे.

यावर सयाजी मारुती चव्हाण, सदस्य यांनी महापौर निवडीच्या कार्यक्रमामध्ये नामनिर्देशीत अर्जांची छाननी, उमेदवारी मागे घेणे यासाठी चा कालावधी कमी दिला असलेबाबत आक्षेप घेतला.

यावर पिठासीन अधिकारी यांनी नगरसचिव यांनी खुलासा करणेची सुचना केली.

नगरसचिव यांनी महापौर व उपमहापौर निवडणूकीच्या विशेष सभेची नोटीस दि. २७/०१/२०२६ रोजी काढणेत आली असुन निवडणूक कार्यक्रमामध्ये नामनिर्देशीत अर्जांची छाननी, उमेदवारी मागे घेणे यांचा कालावधी हा मुंबई प्रांतीक महानगरपालिका महापौर व उपमहापोर या पदासाठी निवडणूक घेणे नियम २००५ अधिनियमातील तरतुदीनुसारच देणेत आला असलेचा खुलासा केला आहे.

वरील प्रमाणे नगरसचिव यांनी केले खुलाशानंतर पिठासीन अधिकारी यांनी सयाजी मारुती चव्हाण यांचा आक्षेप फेटाळला.

यानंतर महापौर पदासाठी विहीत मुदतीत नगरसचिव यांचेकडे खालील प्रमाणे दाखल झालेली नामनिर्देशन पत्रे नगरसचिव यांनी छाननीसाठी पिठासीन अधिकारी यांचे कडे सादर केली.

१) श्री. चव्हाण सयाजी मारुती

२) श्री. उदय आनंदा धातुंडे

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १९ (१), (१अ) १९ (१) (१३) तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका (महापौर आणि उप महापौर या पदांसाठी निवडणुका घेणे) नियम २००५ (सुधारणा) नियम २०१० चे नियम क्र. ४ व ६ अन्वये प्राप्त नामनिर्देशनपत्रांची छाननी करणेत आली.

Scanned with OKEN Scanner

महापौरपदासाठी प्राप्त नामनिर्देशनपत्रांच्या छाननीचे काम पूर्ण होऊन खालील प्रमाणे वैध ठरलेली नामनिर्देशनपत्रे पिठासीन अधिकारी यांनी जाहीर केली.

१) श्री. चव्हाण सयाजी मारुती

२) श्री. उदय आनंदा धातुंडे

छाननीत वैध ठरलेल्या नामनिर्देशन पत्रातून ज्या उमेदवारांना आपली उमेदवारी / नामनिर्देशन पत्र परत घ्यावयाचे असेल त्यांच्यासाठी १५ मिनीटांचा अवधी देणेत आला.

नामनिर्देशन पत्र माघारीसाठी देणेत आलेल्या मुदतीत श्री सयाजी मारुती चव्हाण यांनी आपले नामनिर्देशन पत्र / उमेदवारी माघारी घेतले.

नामनिर्देशन पत्र माघारीसाठी देणेत आलेल्या मुदतीनंतर श्री. उदय आनंदा धातुंडे यांचे एकच नामनिर्देशन पत्र शिल्लक राहिलेने श्री उदय आनंदा धातुंडे यांची इचलकरंजी महानगरपालिकेच्या महापौर पदी बिनविरोध निवड झालेचे पिठासीन अधिकारी यांनी जाहिर केले.

यानंतर इचलकरंजी महानगरपालिका उपमहापौर निवडणूकीच्या कामकाजास सुरवात करणेत आली.

यानंतर उपमहापौर पदासाठी विहीत मुदतीत नगरसचिव यांचेकडे खालील प्रमाणे सादर झालेली नामनिर्देशन पत्रे नगरसचिव यांनी छाननीसाठी पिठासीन अधिकारी यांचे कडे सादर केली.

१) सौ. आलासे संगीता राजु

२) श्री. डाळया अनिल देवकरण

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १९ (१), (१अ) १९ (१) (१३) तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका (महापौर आणि उपमहापौर या पदांसाठी निवडणुका घेणे) नियम २००५ (सुधारणा) नियम २०१० चे नियम क्र. ४ व ६ अन्वये प्राप्त नामनिर्देशनपत्रांची छाननी करणेत आली.

उपमहापौर पदासाठी प्राप्त नामनिर्देशनपत्रांच्या छाननीचे काम पूर्ण होऊन खालील प्रमाणे वैध ठरलेली नामनिर्देशनपत्रे पिठासीन अधिकारी यांनी जाहीर केली.

१) सौ. आलासे संगीता राजु

२) श्री. डाळया अनिल देवकरण

छाननीत वैध ठरलेल्या नामनिर्देशन पत्रातून ज्या उमेदवारांना आपली उमेदवारी / नामनिर्देशन पत्र परत घ्यावयाचे असेल त्यांच्यासाठी १५ मिनीटांचा अवधी देणेत आला.

नामनिर्देशन पत्र माघारीसाठी देणेत आलेल्या मुदतीत सौ. आलासे संगीता राजु यांनी आपले नामनिर्देशन पत्र / उमेदवारी माघारी घेतले.

नामनिर्देशन पत्र माघारीसाठी देणेत आलेल्या मुदतीनंतर श्री. डाळया अनिल देवकरण यांचे एकच नामनिर्देशन पत्र शिल्लक राहिलेने श्री. डाळया अनिल देवकरण यांची इचलकरंजी महानगरपालिकेच्या उपमहापौर पदी बिनविरोध निवड झालेचे पिठासीन अधिकारी यांनी जाहिर केले.

वरील प्रमाणे इचलकरंजी महानगरपालिकेच्या महापौर व उपमहापौर निवडणूकीचे कामकाज पुर्ण होऊन राष्ट्रगीताने सभेचे कामकाज संपले.

श्री संजय शिंदे,
अप्पर जिल्हाधिकारी, कोल्हापूर
तथा पिठासीन अधिकारी

Scanned with OKEN Scanner